दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
● वर्ष १६ वे ● अंक १९३ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शुक्रवार दि.८ ऑक्टोबर २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# पोलिसांसाठी १ लाख घरे बांधण्याचे उद्दिष्ट : गृहमंत्री

## सागरी मार्ग, राष्ट्रीय महामार्गावरील चौक्या, पोलिस वसाहतीसाठी अधिक निधीची तरतूद करावी : आदिती तटकरे

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी राज्यातील पोलिसांना अहोरात्र तत्पर राहावे लागते. यासाठी पोलिसांना त्यांच्या कार्यालयाजवळच निवासस्थान असणे गरजेचे आहे. यासाठी राज्यातील ८० टक्के पोलीस कर्मचाऱ्यांना घरे उपलब्ध करून देण्याकडे महाविकास आघाडी सरकारने लक्ष केंद्रीत केले असून अर्थसंकल्यात ७०० कोटींची तरतूद केली आहे. आगामी वर्षात या तरतुदीमध्ये वाढ केली जाणार असून पोलिस गृह निर्माण कल्याण महामंडळ व नगर विकास खात्यामार्फत पोलिसांसाठी १ लाख घरे बांधण्याचे उद्दिष्ट असल्याचे प्रतिपादन गृहमंत्री ना. दिलीप वळसे-पाटील यांनी महाड येथील पोलिस निवासी संकुलाच्या ऑनलाईन उद्घाटन प्रसंगी केले.



महाड येथे उभारण्यात आलेल्या १०८ फ्लॅटची व्यवस्था असणाऱ्या निवासी संकुलाचे आज राज्याचे गृहमंत्री दिलीप वळसे पाटील यांच्या हस्ते ऑनलाईन उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी राज्याचे गृहराज्यमंत्री ना. शंभुराजे देसाई हे ऑनलाईन उपस्थित होते तर पालकमंत्री ना. आदिती तटकरे कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून तर विशेष अतिथी म्हणून खासदार सुनिल तटकरे, आमदार भरतशेठ गोगावले, आमदार अनिकेत तटकरे, पोलिस महासंचालक संजय पांडे, गृह विभागाचे अप्पर मुख्य सचिव मनूकुमार श्रीवास्तव, अप्पर पोलीस महासंचालक श्री.संजय वर्मा, पोलीस गृहनिर्माण व कल्याण महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक विवेक फणसाळकर, जिल्हाधिकारी डॉ.महेंद्र कल्याणकर, कोकण परिक्षेत्र पोलीस उपमहानिरीक्षक संजय मोहिते, पोलीस अधीक्षक अशोक दुधे, अप्पर पोलीस अधीक्षक अतुल झेंडे आदी मान्यवर उपस्थित होते.

ना. दिलीप वळसे पाटील यांनी पोलिस दलाच्या सर्वांगिण विकासासाठी सरकार कटिबद्ध असून पोलिस दलात नवीन भरतीची प्रक्रिया सुरु झाली आहे. सागरी सुरक्षा व वाहतूक सुरक्षा तसेच महिला, बालक व वृद्धांची सुरक्षा यासाठी पोलिसांना प्रभावीपणे काम करायचे असून कायदा व सुरक्षेत कुठलीही दिरंगाई मान्य नाही, असे



सूचित केले. पोलिस ठाण्यात येणाऱ्या नागरिकांना सौजन्याची वागणूक मिळायला हवी. पोलिस आणि जनतेची मैत्री होईल, त्यावेळीच आपण कोणत्याही संकटाचा सामना करू शकू, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

पालकमंत्री कु. आदिती तटकरे व खासदार सुनिल तटकरे यांच्या पाठपुराव्यामुळेच महाड मधील पोलिस निवासी संकुलाचे लोकार्पण होत आहे. रायगड जिल्ह्यातील अलिबाग येथील पोलिस गृहसंकुल व पोलिस ठाण्याच्या इमारती उभारण्यासाठी सर्व प्रकारचे सहकार्य करण्यात येईल, असे आश्वासन गृहमंत्री श्री. वळसे-पाटील यांनी यावेळी दिले. यावेळी खासदार सुनिल तटकरे, आमदार भरत गोगावले यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक जिल्हा पोलीस अधीक्षक अशोक दुधे यांनी तर आभार सहाय्यक पोलीस अधीक्षक श्री. निलेश तांबे यांनी मानले.

पालकमंत्री कु. आदिती तटकरे यांनी रायगडच्या पोलिस युनिटने राज्यात सर्वोत्तम कामगिरी केली असून या दलाची कामगिरी भविष्यात सर्वोत्तम राहण्यासाठी गृह खात्याने रायगडला झुकते माप द्यावे, अशी अपेक्षा व्यक्त करीत सागरी मार्ग, राष्ट्रीय महामार्गावरील चौक्या, अलिबाग मधील पोलिस वसाहतीसाठी अधिक निधीची तरतूद करावी, अशी विनंतीवजा मागणी केली. तसेच येत्या दि. ११ ऑक्टोबर रोजी महिलांसाठी विशेष लसीकरण मोहीम हा उपक्रम राबविण्यात येणार असून त्याचा लाभ अधिकाधिक महिलांनी घ्यावा, असे महिला वर्गाला आवाहन करीत पावसाळ्यातील ४ महिने महाड येथे पोलिस कंट्रोल रूम कार्यान्वित ठेवण्यात येईल, अशी घोषणाही केली.

गृहराज्यमंत्री शंभुराजे देसाई यांनी राज्याचे मुख्यमंत्री उध्दव ठाकरे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे पोलिस दलाकडे विशेष लक्ष असून पोलिसांना घरांची व्यवस्था चांगली असावी, यासाठी ते आग्रही असल्याचे सांगितले. पोलिस गृह संकुलाच्या देखभाल दुरुस्तीची जबाबदारी सार्वजनिक बांधकाम खात्याकडे न देता गृह निर्माण संस्थेप्रमाणे त्यांची स्वतंत्र तरतूद असावी, अशी सूचना केली.

## संक्षिप्त...

### आर्यन खानला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी



**दै.रायगड नगरी । मुंबई**

कॉर्डेला क्रूझ अमलीपदार्थ प्रकरणात एनसीबीला धक्का बसला आहे. अभिनेता शाहरुख खान याचा मुलगा आर्यन खान याच्यासह अन्य सात आरोपींच्या एनसीबी कोठडीत वाढ करण्याची एनसीबीची विनंती न्यायालयाने फेटाळली आहे. त्याचवेळी न्यायालयाने आर्यन खानसह सर्व आठ आरोपींना १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावली असून आर्यन खानतर्फे लगेचच ज्येष्ठ वकील सतीश माने-शिंदे यांनी अंतरिम जामिनासाठी अर्ज सादर केला आहे. त्याच्यासह अन्य आरोपींच्या वकिलांनीही अंतरिम जामिनासाठी विनंती करत अर्ज सादर केले आहेत. या अर्जांवर आता उद्या सकाळी ११ वाजता सुनावणी होणार आहे. दरम्यान, करोना परिस्थितीला अनुसरून तुरुंग प्रशासनाचे नवे नियम पाहता आजची रात्र या सर्वांना एनसीबीच्या कोठडीतच काढावी लागणार आहे.

### जेएसडब्ल्यू कंपनी विरोधात शिवसेना आक्रमक

## १८ ऑक्टोबर रोजी जेएसडब्ल्यू कंपनीवर २५००० शिवसैनिक धडकणार

**दै.रायगड नगरी । देवा पेरवी / प्रदीप मोकल**

**पेण** : रायगड जिल्हा प्रमुख आमदार महेंद्र दळवी यांच्या नेतृत्वाखाली जेएसडब्ल्यू कंपनी वर भव्य मोर्चा धडकणार आहे. या मोर्चात सुमारे २५००० शिवसैनिक व स्थानिक प्रकल्पग्रस्त सामिल होणार असल्याची माहिती आमदार महेंद्र दळवी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

स्थानिक तरुणांना व भूमिपुत्रांना डावलून सुमारे ४० ते ५० हजार परप्रांतीयांची भरती करणाऱ्या जेएसडब्ल्यू कंपनी विरो-धात शिवसेना आक्रमक झाली असून १८ ऑक्टोबर रोजी मुजोर जेएसडब्ल्यू कंपनी प्रशासना विरोधात शिवसेनेचा भव्य मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. कर्जत खालापूरचे आमदार महेंद्र थोरवे, महाडचे आमदार भरत गोगावले, उरण पनवेल माजी आमदार मनोहर भोईर, शिवसेना सल्लागार बबन पाटील, शिवसेना नेते संजय जांभळे, यांच्यासह शिवसेनेचे पदाधिकारी व २५ हजार शिवसैनिक या मोर्चात सहभागी होणार आहेत.

जेएसडब्ल्यू कंपनीने बेकायदेशीररित्या खारफुटीची कत्तल करून तसेच शासकीय जमिनींवर अतिक्रमण केल्याने स्थानिक नागरिकांमध्ये असंतोष पसरला आहे. संबंधित अधिकाऱ्यांना हाताशी धरून शेतकऱ्यांच्या जमीन लाटण्याचा कंपनी प्रशासनाने खटाटोप चालवला आहे, असा आरोप आमदार महेंद्र दळवी यांनी केला. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. कंपनीच्या मनमानी कारभाराला चाप .../२




## उरणमध्ये कोरोना रुग्णांची मोठ्या प्रमाणात वाढ

### कोरोना सेंटर बंद असल्याने रुग्णांचे मृत्यूला जबाबदार कोण?

**दै.रायगड नगरी । जीवन केणी**

**उरण** : उरणमध्ये कोरोना पॉझिटीव्ह रुग्णांची मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून, उरण तालुक्यातील एकमेव असलेले बोकडविरा येथील कोरोना सेंटर बंद असल्याने पॉझिटिव्ह आढळणाऱ्या रुग्णांची गैरसोय होत असून,कोरोना रुग्णांच्या मृत्यूची संख्याही बळावली आहे.

केंद्र सरकारने राज्य सरकारला देण्यात येणारा कोरोना सेंटरच्या कर्मचाऱ्यांचे पगार बंद केल्याने मागील दिड महिन्यांपासून १ सप्टेंबर २०२१ पासून उरण तालुक्यात सुरू करण्यात आलेले बोकडविरा येथील कोरोना सेंटर बंद केल्याने शासन कोरोना बाधित रुग्णांच्या जीवाशी खेळ खेळत असल्याची प्रतिक्रिया उरण सामाजिक संस्थेचे सरचिटणीस संतोष पवार यांनी व्यक्त केली आहे.

२० सप्टेंबर ते ६ ऑक्टोबर २०२१ पर्यंत १६ दिवसात उरण तालुक्यात ४९ कोरोना पॉझिटिव्ह रुग्ण आढळून आले आहेत.त्यातील २४ रुग्ण एकटू असल्याची माहिती हाती आली असून,उरण,पनवेल येथील खाजगी रुग्णालयात तर काही रुग्ण घरच्या घरी उपचार घेत आहेत. उरण तालुक्यातील बोकडविरा कोरोना सेंटर येथील १ डॉक्टर,४ नर्स,२ केमिसिस, २ डेटा ऑफरेटर,ऑक्सिजन युनिट १,१ रुग्णवाहिका चालक व ५ सफाई कामगार असे एकूण १६ कर्मचाऱ्यांचे पगार बंद केल्याने हे कोरोना सेंटर बंद करण्यात आले आहे.



**तिसऱ्या लाटेला रोखण्यासाठी कोरोना सेंटर सुरु करण्याची गरज**

मात्र २ ते अडीच लाख पगाराच्या अडचणीमुळे कोरोना सेंटर बंद करण्याचा शासनाचा निर्णय उरण वासीयांच्या जीवाशी खेळ खेळत असल्याचे दिसत आहे.मुंबई येथे काल ६०९ रुग्णांची नोंद एका दिवसात झाली आहे.त्यामध्ये ७ रुग्णांचा मृत्यू झाला आहे. हाकेच्या अंतरावर असलेल्या मुंबई शहराच्या बाजूला वसलेल्या उरण तालुक्यात जेएनपीटी बंदर परिसरात .../२

उरणचे कोरोना सेंटर सुरू करण्याची येथील प्रकल्पांना पत्रव्यवहार केला आहे.त्यांच्याकडून प्रतिसाद न मिळाल्यास कोणत्याही परिस्थितीत येथील कोरोना सेंटर सुरू करण्याची तयारी उरणचे माजी आमदार मनोहर भोईर यांनी चर्चे अंती दाखविली आहे.मात्र आरोग्य विभागाच्या उपसंचालक श्रीमती राठोड यांनी सांगितले की, उरणचे कोरोना सेंटर नॉनकोविड सेंटर म्हणून शासनाने घोषित केल्याने ते चालू करता येणार नव्याने बाधित होणाऱ्या रुग्णांना पनवेल उपजिल्हा रुग्णालयात व कामोठे एम.जी.एम. रुग्णालय येथे पाठवावे.

**डॉ.जे.के.देसाई, वैद्यकीय अधिक्षक इंदिरा गांधी ग्रामीण रुग्णालय उरण**

### कोरोना नियमांचे पालन करीत महाराजांच्या नवरात्रोत्सवास सुरुवात

## रोह्याचे ग्रामदैवत श्री धाविर महाराज देवघटी बसले!

**दै.रायगड नगरी । रोहा**

देशात ज्या दोन देवस्थानांना पोलिस मानवंदना देण्याची प्रथा, परंपरा ब्रिटीश काळापासुन सुरू आहे त्यापैकी एक असलेले रायगड वासियांचे श्रध्दास्थान आणि रोहयाचे ग्रामदैवत श्री धाविर महाराज गुरूवारी मंगलमय वातावरणात विधिवत देवघटी बसले. कोरोना नियमांचे पालन करीत अतिशय कमी भक्तगणांच्या उपस्थितीत महाराजांच्या नवरात्रोत्स-वास सुरुवात झाली.

रोहा शहराच्या पश्चिम बाजुला हनुमान तेकडीच्या पायथ्याशी असलेल्या या सुंदर आणि भव्य मंदिरामध्ये गाभाऱ्यात श्री धाविर महाराज, कालिका माता, बहिरीबुवा वाघबाप्पा मागे तीन वीरा यांचे स्थान आहे. व मंदिराबाहेर महाराजांचा अंगरक्षक चेडा देवाचे स्थान आहे.





कोरोनाच्या तिसऱ्या लाटेची शक्यता व्यक्त होत असल्याने यंदाही गतवर्षीप्रमाणे अतिशय साध्या पद्धतीने महाराजांचा नवरात्रोत्सव साजरा होत आहे. कोरोनाच्या पाश्वभूमीवर शासनाने घालून दिलेल्या नियमांची पाळनुक करीत सर्व नियोजन करण्यात आले आहे. हा उत्सव रोहा .../२

## नादुरुस्त झालेले सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याकडे नगरपरिषदेचे दुर्लक्ष

**दै.रायगड नगरी । संतोष चौकर**

**श्रीवर्धन** : २०२० साली तीन जून रोजी श्रीवर्धन तालुक्याला निसर्ग चक्रीवादळाचा तडाखा सहन करावा लागला होता. सदर वादळाचा लैंडफॉल श्रीवर्धन व हरिहरेश्वर या ठिकाणी झाल्यामुळे श्रीवर्धन, हरिहरेश्वर परिसरात वादळाने अक्षरशः कोणालाही सुखरूप सोडले नाही.



श्रीवर्धन, हरिहरेश्वर परिसरात असंख्य झाडे पडली, त्याच प्रमाणे आजही दीड वर्ष उलटून गेले तरी निसर्ग चक्रीवादळाच्या खुणा जागोजागी पाहायला मिळतात. २०१७ व २०१८ या दोन वर्षांमध्ये श्रीवर्धन शहरामध्ये मोठ्या प्रमाणावर बंद घरे फोडण्याचे प्रकार सुरू होते. तर काही वेळेला अनेक ठिकाणी बंद घर पाहून चोऱ्या देखील झालेल्या आहेत. त्यानंतर शासनाच्या मदतीने श्रीवर्धन नगर परिषदेने श्रीवर्धन शहरात एकूण बहात्तर ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविले होते व त्याचा डिस्प्ले श्रीवर्धन पोलीस ठाणे व नगरपरिषद कार्यालय या ठिकाणी ठेवण्यात आला होता. शहरात सीसीटीव्ही कॅमेरे बसवल्या नंतर एकही चोरीची घटना घडली नव्हती. मात्र निसर्ग चक्रीवादळाच्या तडाख्यामध्ये सीसीटीव्ही कॅमेरे नादुरुस्त झाले तर अनेक कॅमेरे उभे केलेले खांब पडून गेल्यामुळे .../२

# वेतनासाठी लढा कायम ; साखळी उपोषणाचा सहावा दिवस

**दै.रायगड नगरी । मुकूंद रांजाणे**

**माथेरान** : मानवाच्या मूलभूत गरजा आणि घटनेने जे काही अधिकार आणि हक्क दिले आहेत त्यांची पूर्तता करणे हे शासनाचे आद्यकर्तव्यच आहे.तळागाळातील पीडित, सोशीत आणि अनुसूचित जाती जमातीच्या लोकांना पुरेशा सुखसोयी कशाप्रकारे प्राप्त करून देता येतील.राज्यात नव्हे तर देशात कुणीही दारिद्र्य रेषेखालील नसावा, आजही डोंगरदर्यात आदिवासी समाज मोठया प्रमाणावर अनेक संकटांना तोंड देत आपल्या कुटुंबाला आधार देण्यासाठी काबाडकष्ट करीत आहे. तर काही भागात अठरा विश्व दारिद्र्य अशीच भयावह परिस्थिती निर्माण झालेली असल्याने आजही कुपोषित बालके मृत्यूच्या छायेत आढळून येतात. केवळ मतांचा जोगवा मागणारे निष्ठुर उमेदवार निवडून आल्यावर एकदाही फिरकताना दिसत नाहीत ही खरोखरच आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात शोकांतिका म्हणावी लागेल.

डॉ बाबासाहेब आंबेडकरांनी घटनेच्या माध्यमातून जे काही अधिकार आणि हक्क अनुसूचित जमातीच्या लोकांना प्राधान्याने दिलेले आहेत त्यांची अंमलबजावणी करण्यासाठी शासन आजही असमर्थता दर्शवित आहे.शासकीय सेवेत असताना अत्यंत इमानेइतबारे सेवा केल्यानंतर त्या त्या कर्मचाऱ्यांना आपल्याच हक्काचे सेवानिवृत्त वेतन मिळविण्यासाठी उन्हातान्हात घरदार मुलेबाळे सोडून उपोषण करावे लागते आहे.म्हणजे खऱ्या अर्थाने शासनाला या तळागाळातील कष्टकरी अनुसूचित जमातीच्या बाबतीत काहीही स्वारस्य नसल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. याच डोंगर दर्यात राहणाऱ्या आदिवासी समाजाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात स्वराज्य स्थापन करण्यासाठी प्राणांची आहुती दिलेली आहे. त्यांना आज एकविसाव्या शतकातील नव्या आधुनिक काळात सुध्दा हक्क आणि अधिकारासाठी



शासनाच्या पुढे मागणी करावी लागते ही निष्ठुर शासनासाठी अत्यंत क्लेशदायक बाब आहे.

सेवानिवृत्त वेतन मिळावे यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातुन अनुसूचित जमातीच्या लोकांनी २ ऑक्टोबर या गांधी जयंतीच्या दिवशी मुंबई येथील आझाद मैदानावर साखळी उपोषण सुरू केले आहे त्याचा आजचा सहावा दिवस उजाडला आहे परंतु अद्याप शासनाने काहीएक निर्णय घेतला नाही.कोरोनाच्या महासंकट काळात आणि त्याअगोदर जवळजवळ दीड वर्षांपासून सेवानिवृत्त वेतन न मिळाल्यामुळे अनेकांवर उपासमारीची वेळ आली. या समाजाच्या लोकांना आपला हक्क मिळावा यासाठी आफ्रोह संघटनेने वेळोवेळी शासनाकडे कायदेशीर बाबींच्या आधारावर निवेदने सादर केली आहेत.त्याचबरोबर विविध मंत्रीमहोदयांच्या मार्फत सुद्धा आम्हाला शासनाकडे बाजू मांडण्याची संधी द्या,अशी विनंती केली आहे.मात्र अन्यायग्रस्त अनुसूचित जमातीच्या कर्मचा-यांवर एका विशिष्ट संघटनेच्या दबावाखाली येवून व जात प्रमाणपत्र तपासणी समितीच्या माध्यमातून लबाडीने , फसवणूकीने विशिष्ट जमातीवर अन्याय केला जात आहे.ऑर्गनायझेशन फॉर राईट्स ऑफ ह्युमन ,महाराष्ट्रचे कार्याध्यक्ष राजेश सोनपरोते ते आज मुंबईत आझाद मैदानावर सेवानिवृत्त कर्मचा-यांच्या मागण्यांसाठी गेल्या २ आक्टोबरपासून आफ्रोहच्यावतीने सुरू असलेल्या साखळी उपो-षणाला भेट देण्यासाठी आले होते.

शासकीय कर्मचा-यांच्या बाबतीत शासनाने निर्णय घेताना आमच्याशी बोलावं अशी मागणी आफ्रोहचे कार्याध्यक्ष राजेश सोनपरोते यांनी शासनाकडे केली आहे.यावेळी त्यांच्या सोबत राज्य कोषाध्यक्ष मनीष पंचगाम,राज्य सदस्य व मार्गदर्शक नरेशजी खापरे,महिला आघाडीच्या प्रियाताई खापरे , पुणे जिल्हा सचिव अभय जगताप,अमरावती जिल्हाध्यक्ष यशवंत वरूडकर,जिल्हा सचिव नरेंद्र ढोलवाडे,रतन नाथे, ठाणे जिल्हा अध्यक्ष दयानंद कोळी, उपाध्यक्ष अर्जून मेस्त्री ,घनश्याम हेडाऊ, नरेंद्र भिवापूरकर, पुणे आफ्रोहचे राजेंद्र गायकवाड,चंद्रकांत शिंदे,पुष्पा किताडीकर,मुकुंद सपकाळ,भोजराज ठाकरे हे उपस्थित होते.

दोन वर्षापासून अधिसंख्य पदावर वर्ग केलेल्या सेवानिवृत्त कर्मचा-यांना सेवानिवृत्तीचे लाभ नाहीत,ही पुरोगामी महाराष्ट्राच्या दृष्टीने अत्यंत लाजीरवाणी बाब असल्याची खंतही सोनपरोते यांनी व्यक्त केली. सेवानिवृत्त कर्मचारी व अधिअंख्य पदावरील कर्म-यांच्या बाबतीत निर्णय घेताना आमच्याशी शासनानं बोलावं,आमची बाजू मांडण्याची संधी आम्हाला द्यावी,आमचं म्हणणं ऐकूण घ्यावं,अशी मागणीही सोनपरोते यांनी यावेळी केली.साखळी उपोषणाच्या आजच्या सहाव्या दिवशी पुण्याच्या पुष्पा किताडीकर, नागपूरचे धनराज हेडाऊ,पुण्याचे भोजराज ठाकरे, साता-याच्या शालन मोरे हे सेवानिवृत्त कर्मचारी व त्यांचे नातेवाईक उषोषणाला बसले आहेत.

# कोटेश्वरी देवी मंदिर भाविकांसाठी खुले केल्याने भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण

**दै.रायगड नगरी । मुरुड**

मुरुडच्या वेशीवरील ऐतिहासिक वारसा लाभलेली, मूळचे स्थान पद्मदूर्ग किल्लयातील असलेल्या ग्रामदेवता श्री कोटेश्वरी देवीवर मुरुड मधील भाविकांची अपार श्रद्धा आहे, नवरात्रोत्सवामध्ये नऊ दिवस मंदिरात देवीच्या दर्शनासाठी भाविकांची खूप गर्दी असते , देवीला रोज नवीन साडी व आभूषणांनी सजविले जाते तसेच मंदिर ट्रस्ट,समितीतर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाते , परंतु कोरोनाच्या पार्श्वभूमीवर हे मंदिर लॉकडाउन काळात बंद केल्याने भाविकांची घोर निराशा झाली होती आता कोरोनाचा प्रसार कमी झाल्याने शासनाने प्रतिबंधित क्षेत्राबाहेरील धार्मिक स्थळे कोरोना सुरक्षिततेबाबत घालून दिलेल्या अटी व नियमांचा अवलंब करून सुरु करण्याबाबत मान्यता दिल्याने भाविकांमध्ये उत्साहाचे व आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून , श्री कोटेश्वरी मंदिरात पहाटे पासूनच भाविकांनी कोरोनाबाबतचे नियम पाळून दर्शनाचा लाभ घेतला.

# बोर्लीपंचतनमध्ये अनधिकृत बांधकामांवर हातोडा, प्रशासनाची संयुक्त कारवाई

**दै.रायगड नगरी । गणेश प्रभाळे**



**दिघी** : श्रीवर्धन तालुक्यातील लोकसंख्येच्या दृष्टीने मोठे शहर असणाऱ्या बोर्लीपंचतन परिसरात सर्वेनंबर हद्दीतील अतिक्रमनावर कारवाई करण्यात आली. रस्त्यावर झालेल्या अतिक्रमनावर मंगळवार पासून सुरू झालेल्या तीन दिवसीय कारवाईत प्रशासनाकडून हद्द कायम करत बेकायदेशीर बांधकाम पाडण्यात आले. मात्र, या कारवाईत अनेकांचा व्यवसाय बुडाला आहे.

बोर्लीपंचतन शहराची सर्वाधिक विस्तारित प्रसिद्ध बाजारपेठ म्हणून ओळख आहे. या शहरातुन श्रीवर्धन ते पुणे, मुंबईला जोडणारा मुख्य रस्ता गेला आहे. येथील गावठाण हद्द सोडून याच रस्त्याच्या दोन टोकांना, शहरातील प्रमुख ठिकाण असणाऱ्या एसटी बसस्थानक व पोहामिल नाका क्षेत्रातील अनेक दुकाने ही सर्वेनंबरमध्ये येत आहेत. या भूखंडावर जवळपास ४० दुकाने अतिक्रमणमध्ये असल्याने प्रशासनाकडून तीन दिवसांपूर्वी व्यापाऱ्यांना हद्द कायम करण्यात येईल अशी नोटीस बजावण्यात आली. यानुसार १०७, ११३, ११४, ११५, ११६, ११७ व १३२ सह अंतर्गत येणाऱ्या ३९ पोट सर्वेनंबर जागेत मंगळवारी दिनांक ५ रोजी कारवाई करण्यास सुरुवात करण्यात आली.

दुकानदारांनी मोजणीच्या वेळी आपली दुकाने खाली केल्याने नुकसान झाल्याचे कुठे दिसून आले नाही. ही अतिक्रमण मोहिम बोर्ली शहरात तीन दिवस राबविण्यात आली.

या कारवाईत सुमारे २० शेड व १५ अनधिकृत बांधकामे श्रीवर्धनचे उपविभागीय अधिकारी अमित शेडगे यांचे मार्गदर्शनाखाली सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच भूमिअभिलेख आणि महसूल विभाग यांच्या निर्देशानुसार जेसीबीच्या सहायाने पाडण्यात आली. ही जमीन बांधकाम विभागाची मालकीची असून त्यावर अतिक्रमणे झालेली होती, या कारवाईवेळी मोठा पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

# महिलांसाठी कोविड-१९ विशेष लसीकरण मोहीम

**दै.रायगड नगरी । अलिबाग**

अलिबाग-रायगड जिल्ह्यातील १८ वर्षावरील सर्व महिलांसाठी नवरात्रौत्सवाचे औचित्य साधून करोना लसीकरणाची विशेष मोहीम पालकमंत्री ना. कु. आदिती तटकरे यांच्या संकल्पनेतून सोमवार, दि. ११ ऑक्टोबर २०२१ रोजी राबविण्यात येणार आहे. या दृष्टीने जिल्हा प्रशासनाने आवश्यक ते नियोजन करावे, असे निर्देशही त्यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहेत. करोनाची तिसरी लाट येण्याची शक्यता वैद्यकीय तज्ज्ञांनी व्यक्त केल्याने रायगड जिल्ह्यातील नागरिकांचे आरोग्य सुरक्षित राखण्यासाठी पालकमंत्री ना.कु.आदिती तटकरे यांनी फक्त महिलांसाठी करोना लसीकरणाची विशेष मोहीम राबविण्याचा निर्णय घेतला आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## १८ ऑक्टोबर रोजी जेएसडब्ल्यू कंपनीवर २५००० शिवसैनिक धडकणार

लावण्याकरिता व स्थानिक नागरिकांना न्याय मिळवून देण्याकरिता शिवसेनेने लोक आंदोलन करीत धडक मोर्चाचे आयोजन केल्याची माहिती शिवसेना जिल्हाप्रमुख आमदार महेंद्र दळवी यांनी घेतलेल्या पत्रकार परिषदेत दिली.

कंपनी प्रशासन जाणून-बुजून स्थानिक सुशिक्षित बेरोजगारांना नोकऱ्या देत नाही तर कंपनीचे कामे करण्यासाठी हजारोंच्या संख्येने परप्रांतीयांची भरती करते त्यामुळे स्थानिक भूमिपुत्रांवर अन्याय होत असल्याचे आ.महेंद्र दळवी यांनी सांगितले. कंपनीच्या प्रदूषणामुळे संपूर्ण पेण तालुका स्थलांतरित करण्याची वेळ आली असून जेएसडब्ल्यू कंपनीच्या प्रदूषणामुळे वडखळ विभागातील नागरीकांचे आरोग्य धोक्यात आले असून येथील ग्रामस्थांना रोजच आरोग्याच्या समस्यांना तोंड द्यावे लागते अशी माहिती संजय जांभळे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

## उरणमध्ये कोरोना रुग्णांची मोठ्या प्रमाणात वाढ

नोकरी धंद्याच्या निमित्ताने शेकडो नागरिक दररोज ये - जा करीत आहेत.त्यामुळे आत्ता मुंबईतून उरणमध्ये मोठ्या प्रमाणात रुग्ण निष्पन्न होण्याचे नाकारता येत नाही.

राज्य सरकारने कोरोना सेंटर बंद केल्याने येथील इंदिरा गांधी रुग्णालयाचे वैद्यकीय अधिक्षक देसाई यांनी हे बोकडविरा येथील कोरोना सेंटर पूर्ववत करण्यासाठी उरण तालुक्यातील ८ प्रकल्पांच्या व्यवस्थापकांना पत्रव्यवहार करून कोरोना सेंटरच्या कर्मचाऱ्यांच्या पगाराची व्यवस्था करण्यासाठी हालचाली सुरू केल्या असल्याचीही माहिती संतोष पवार यांनी दिली आहे.

## रोह्याचे ग्रामदैवत श्री धाविर महाराज देवघटी बसले!

गावाचा एक कौटुंबिक धार्मिक सोहळा असल्याने रोहेकरांनी काळजीपूर्वक दिलेल्या सूचनांचे पालन करीत मंदिरात अधिक गर्दी होणार नाही याची काळजी घेतली, मोजक्या लोकांच्या उपस्थितीत उत्सवास विधीवत प्रारंभ झाले.

हे धाविर महाराजा समस्त रोहावासिय ग्रामस्थांनी श्रध्देने आणी पारंपारीक पध्दतीने तुझा नवरात्रोत्सव मांडला आहे, या उत्सवामध्ये आमच्या हातुन चांगली सेवा होईल.. काही चुका सुध्दा होतील पण महाराजा हा उत्सव गोड मानून घे तुझ्या गावाला संकटापासून दूर ठेव असे देवस्थानचे पुजारी वालेकर यांनी श्री धाविर देवस्थानचे काही विश्वस्थ आणि प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत देवाकडे गारहाणे मांडले आणी अक्षतांची उधळण देवावर होत ग्रामदैवत श्री धाविर महाराजांच्या उत्सवास प्रारंभ झाला.

यावेळी मंदिरात विश्वस्थ मंडळाचे अध्यक्ष प्रशांत देशमुख, कार्यवाह मकरंद बारटक्के, उत्सव समितीचे अध्यक्ष शैलेश कोळी, सरचिटणीस भुषण भादेकर, माजी नगराध्यक्ष लालताप्रसाद कुशवाह, समीर शेडगे, विश्वस्त नितिन परब, विजयराव मोरे, आप्पा देशमुख, सुभाष राजे, समीर सकपाळ, प्रकाश पवार, महेश सरदार, संदीप सरफळे, अमित उकडे, राजेश काफरे, सूर्यकांत कोलाटकर, रवींद्र चाळके आदींसह उत्सव समितीचे पदाधिकारी आणि प्रमुख मान्यवर उपस्थित होते. माजी आमदार अनिल तटकरे यांनी मंदिरात उपस्थिती लावून महाराजांचे दर्शन घेतले. कोरोनाचे दुसऱ्या लाटेच्या शेवटच्या टप्प्यात मंदिर यंदा खुले करण्यात आले असून कोरोना नियमांचे पालन करीत श्री धाविर महाराजांचा नवरात्रोत्सव विधिवत व भक्तिमय वातावरणामध्ये साजरा होणार आहे. दर रात्रीला शहरातील प्रत्येक आळीला प्रहर जागवीण्याचा बहूमान असतो.

अपुर्व अशा उत्साहामध्ये सुरू झालेल्या या उत्सवाची सांगता दसाऱ्याच्या दुसऱ्या दिवशी रायगड पोलिसांच्या मानवंदने नंतर निघणाऱ्यां महाराजांच्या पालखी सोहळयाने संपन्न होत असते. यंदा पालखी उत्सवाच्या नियोजनाबाबत पालकमंत्री अदिती तटकरे यांनी आज गुरुवारी सायंकाळी रोह्यात देवस्थानाची प्रमुख मंडळी यांची जिल्हाधिकारी रायगड व जिल्हा पोलिस अधीक्षक रायगड यांची संयुक्त बैठक बोलावली आहे. यंदा अतिशय सध्या पद्धतीने उत्सव होत असला तरी या उत्सवानिमित्त मंदिराचा परिसर विविध रंगी फुलांच्या सजावटीने सजविण्यात आले आहे.. सुंदर रांगोळयांनी वातावरण प्रसन्न झाले असून मंदिरात प्रवेश द्वार, रांगोळी व फुलांची आरास आकर्षक अशी करण्यात आली आहे.

## नादुरुस्त झालेले सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्याकडे नगरपरिषदेचे दुर्लक्ष

कॅमेरे पूर्णपणे फुटुन गेले. सीसीटीव्ही कॅमेरे नसल्याचे साधून चोरट्यांनी श्रीवर्धन शहरात काही दिवसापूर्वी काही घरांवरती दरोडा टाकून लाखो रुपयाचा ऐवज लंपास केल्याच्या घटना घडल्या आहेत. शहरात सीसीटीव्ही कॅमेरे असल्यामुळे अनेक गुन्ह्यांचा तपास करणे देखील पोलिसांना सोपे जात होते. श्रीवर्धन नगरपरिषद प्रशासन शहरातील नागरिकांकडून वेळोवेळी कराच्या रकमा वसूल करत असते. परंतु नागरिकांना ज्या सोयी सुविधांची आवश्यकता हवी आहे त्याबाबत नगरपालिका नेहमीच दुर्लक्ष करीत असल्याचा आरोप नागरिकांमधून करण्यात येत आहे. तरी नगरपरिषद प्रशासनाने श्रीवर्धन शहरातील सीसीटीव्ही कॅमेरे पूर्ववत चालू करावे अशी मागणी नागरिकांमधून केली जात आहे.


मा.गोडसे मॅडम

ॲड.वनिता मते

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश (व.स्तर) यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.५५५/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१०/११/२०२१

श्री.टेकचंद होतचंद चौघ
वय : ७५ वर्षे, धंदा :
रा.होतचंद चौघ, ५०५ बी, मंगल टॉवर,
प्लॉट नं.५३, सेक्टर १७, वाशी नवी मुंबई — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, अर्जदार यांचे भाऊ मयत कै.चंदाराम होतचंद चौघ हे दि.०४/११/२०२० रोजी मयत झाले आहेत. मृत्यूसमयी मयत कै.चंदाराम होतचंद चौघ यांच्या मालकीची व हिश्श्याची खालील वर्णनाची मिळकत आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**फ्लॅट नं.३०४, तिसरा मजला, कामोठे शालोम रेसिडेन्सी को.ऑप.हौ.सोसायटी लि, प्लॉट नं.२२, सेक्टर ८, कामोठे, नवी मुंबई, तालुका : पनवेल**

अर्जदार यांनी सदरील चौकशी अर्ज मयत कै.चंदाराम होतचंद चौघ यांचे कायदेशीर वारस असल्याचे घोषित करून मिळणेकरिता दाखल केला आहे. सबब सदरील चौकशी अर्जाचे कामी अर्जदार यांचे क्लेम संबंधात जर कोणाचीही कसलीही हरकत असल्यास सदरची हरकत ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत मे.न्यायालयात दाखल करावी. विहित मुदतीनंतर आलेल्या हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभांत वारस दाखला प्रदान करण्यात येईल हे सर्व कळावे.

ही नोटीस आज दि.७/१०/२०२१ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्याने दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**

ॲड.रेखा होवाळे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे समोर नवी मुंबई

अर्ज क्र.१२६८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१९/११/२०२१

१) श्रीमती.कल्पना प्रकाश हिवाळे
वय : ४५, व्यवसाय : काही नाही
रा.आंबेडकर नगर नं.२, पेस्तम सागर,
जुना रेती बंदर रोड नं.६, चेंबुर, मुंबई — अर्जदार

विरुद्ध

१) केतन प्रकाश हिवाळे
२) सेजल प्रकाश हिवाळे
दोघेही रा.आंबेडकर नगर नं.२, पेस्तम सागर,
जुना रेती बंदर रोड नं.६, चेंबुर, मुंबई — सामनेवाला

ज्यापेक्षा मयत श्री.प्रकाश वामन हिवाळे ०३/०३/२०२१ रोजी मुंबई येथे निधन पावले आणि अर्जदार नं.१ ही पत्नी आहे आणि सामनेवाला नं.१ व २ ही मुले आहेत. यांनी त्यांचे खलील मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे. मिळकतीचे वर्णन :-

SCHEDULE OF PROPERTY 'A'
Name of the Property Holder : Late Shree Prakash Waman Hiwale
Cluster No.E-122, Plot No.12, Sector-12, Kharghar,
Admeasuring Area 28.00 Sq Ft. Mtrs.
Value Rs.21,473/-
(Rupees twenty one thousand four hundred seventy three only)

यासाठी सर्टीफिकेट मिळावे असा अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजविण्याचे असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत कोर्टात हजर राहून आपली हरकती कळवाव्या आणि या लेखी नोटीस वरुन असे कळविण्यात येते की, तसेच योग्य मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट या अर्जदारास ह्यांचे बद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयत यांचा वारस घोषित करेल.

तारीख ६ माहे १० सन २०२१ बेलिफाकडे

**सही/- क.लिपीक सिव्हील कोर्ट, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक सिव्हील कोर्ट, पनवेल**

श्रीमती.माधुरी आनंद मॅडम

श्री.शिवाजी एम.पाटील
पनवेल, जि.रायगड

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश रायगड पनवेल यांचे न्यायालयात

दि.चौ.अर्ज क्र.५९/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.२८/१०/२०२१

श्रीमती.प्रियंका प्रभाकर नागांसुरे
वय : ४३ वर्षे, व्यवसाय : गृहिणी
पत्ता : कोल्ही, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

याद्वारे जाहीर करण्यात येते की, पनवेल येथील मे.अतिरिक्त जिल्हा न्यायाधिश साहेब यांचे न्यायालयात दिवाणी चौकशी अर्ज क्रं.५९/२०२१ नुसार अर्जदार यांस कु.संकेत प्रभाकर नागांसुरे, यांच्या हिश्श्याची अथवा त्याला मिळणाऱ्या हिश्याची मौजे : पुष्पकनगर, ता.पनवेल, जि.रायगड येथील प्लॉट नं.२०१, सेक्टर आर-३, क्षेत्र ४८० चौ.मी. ही प्लॉट मिळकत विक्री करणेकरिता, किंवा हक्कसोडपत्र करणेकरिता व सदर प्लॉट मिळकतीचे त्यांच्या वतीने खरेदीखत करण्याकरिता, करारावर सही करण्याकरिता, सदरचे करार नोंदणीकृत करणेकरिता, सदर विक्रीतून मिळणारी मोबदल्याची रक्कम स्वीकारण्याकरिता अर्ज केलेला आहे.

सदर अर्जदार ह्यांचे पती कै.प्रभाकर बाबु नागांसुरे निधन दि.१०/२/२०१७ रोजी मु.किल्लारी तांडा, ता.औसा, जि.लातूर येथे झाले आहे. अर्जदार श्रीमती.प्रियंका प्रभाकर नागांसुरे यांच्या व्यतिरिक्त कु.संकेत प्रभाकर नागांसुरे याचे अज्ञान पालनकर्ती जनक माता म्हणून कोणाचेही हरकत, हक्क अधिकार किंवा हितसंबंध असतील तर त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून तीस दिवसाच्या आत आपला हक्क हितसंबंधाबाबत योग्य तो कायदेशीर पुरावा घेवून किंवा दिनांक २८/१०/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायालयात हजर रहावे. अन्यथा कोणाचेही कोणत्याही प्रकारचे हक्क अधिकार अथवा हितसंबंध नाहीत असे गृहीत धरुन मे.कोर्ट पुढील कारवाई करेल.

सदर नोटीस आज दि.०७/१०/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक जिल्हा व अति. न्याया, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक जिल्हा व अति. न्याया, पनवेल**

ॲड.रेखा होवाळे

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे समोर

चौ.अर्ज क्र.१३२३/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.१७/११/२०२१

१) श्रीमती.सविता गोपाल देशपांडे
वय : ५२, व्यवसाय : काही नाही
२) कु.वसुधा गोपाल देशपांडे
वय : १५, व्यवसाय : विद्यार्थी
सर्व जण रा.महालक्ष्मी को.ऑप.हौ.सो.,
ए-१३, अणुशक्ती नगर, मुंबई — अर्जदार

ज्यापेक्षा मयत श्री.गोपाल महिपत देशपांडे यांचा मृत्यू दि.०६/०५/२०२१ रोजी वाशी येथे झाला आहे. अर्जदार नं.१ ही पत्नी व अर्जदार नं.२ ही मुलगी आहे आणि अर्जदार यांनी खालील मिळकतीबाबत वारस दाखला मिळणेसाठी अर्ज दाखल केला आहे.

SCHEDULE OF PROPERTY 'A'
Mahalaxmi CHS, Flat No.C-12, on third floor, Plot No.4,
Sector-12, Dist-Raigad. Agreement value of Rs. 4,92,493/-
(Four lakhs ninety two thousand four hundred ninety three only)

यासाठी सर्टीफिकेट मिळावे असा अर्ज दाखल केला आहे. सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नाही असे कोणास समजविण्याचे असल्यास ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झालेपासून एक महिन्याचे आत कोर्टात हजर राहून आपली हरकती कळवाव्या आणि या लेखी नोटीस वरुन असे कळविण्यात येते की, तसेच योग्य मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास तर सदरहू कोर्ट या अर्जदारास ह्यांचे बद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयत यांचा वारस घोषित करेल.

तारीख ६ माहे १० सन २०२१ बेलिफाकडे

**सही/- क.लिपीक सिव्हील कोर्ट, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक सिव्हील कोर्ट, पनवेल**

प्रो.जमा.६-२५

अर्जदाराचे वकील
ॲड.निलम मुंगाजी

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायायधिश व.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१३०७/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२०/११/२०२१

१) सुब्रोत बालाराम पात्रो (मुलगा)
वय : ४२ वर्षे, धंदा : नोकरी
फ्लॅट नं.१०६, गारनेट ब्लॉक, मदिनागुडा,
सेरीलिंगमपाली, हैदराबाद, आंध्र प्रदेश-५०००४९
२) बालाराम दंडपाणी पात्रो (पती)
वय : ६८ वर्षे, धंदा : निवृत्त
रा.सीएच-१/४१, केंद्रीय विहार,
सेक्टर ११, खारघर, रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी कै.सुशिला बालाराम पात्रो ह्या दि.२२/१२/२०२० रोजी रा.श्रीकारा हॉस्पिटल मियापूर, हैदराबाद त्यांचे नावे खालील वर्णनाची मिळकत आहे.

**मिळकतींचे वर्णन**
**हार्ड रॉक को.ऑप.हौ.सोसायटी लि., शॉप नं.१२, तळमजला, प्लॉट नं.६-१०, सेक्टर-०७, खारघर, ता.पनवेल, जि.रायगड क्षेत्र २५३ चौ.फूट (कारपेट एरिया)**

कै.सुशिला बालाराम पात्रो यांचे मृत्यूपश्चात त्यांस अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करीत आहे. सदर वारसांव्यतिरिक्त इतर कोणीही वारसदार नाहीत. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ३० दिवसांचे आत या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणत्याही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख ७/१०/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/- क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल** — कोर्टाचा शिक्का — **सही/- सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## प्रतापगड देवीभक्तांसाठी महाड आगारातून एस.टी.बसच्या विशेष फेऱ्या

**दै.रायगड नगरी । पोलादपूर**

शारदीय नवरात्रौत्सवामध्ये प्रतापगडाकडे जाणाऱ्या देवीभक्तांसाठी पोलादपूर नगरपंचायतीच्या माजी नगरसेविका संगिता इंगवले यांनी महाड एस.टी.आगाराकडे मागणी केल्यानुसार एस.टी.बसच्या विशेष फेऱ्या सुरू झाल्याची माहिती एस.टी. महामंडळाचे आगारप्रमुख शिवाजी जाधव यांनी दिली.


गुरूवारी घटस्थापनेच्या मुहूर्तावर सुरू होत असलेल्या या महाड ते प्रतापगड एस.टी. बसच्या दररोज दोन फ ेरीचे दसऱ्यापर्यंतचे वेळापत्रक महाड एस.टी.आगाराकडून जाहिर करण्यात आले आहे. यानुसार पहिली फेरी सकाळी महाडमधुन निघण्याची वेळ सकाळी ७ वाजता, पोलादपुर निघण्याची वेळ सकाळी साडेसात वाजता, प्रतापगडावरुन निघण्याची वेळ साडेअकरा वाजता, दुसरी फेरी महाडमधून निघण्याची वेळ दुपारी २ वाजता, पोलादपुर निघण्याची वेळ दुपारी अडीच वाजता, प्रतापगड वरुन निघण्याची वेळ सायंकाळी साडेपाच वाजता असे वेळापत्रक निर्धारित करण्यात आले आहे. भाविकांनी याची नोंद घेऊन सुरक्षित प्रवासासाठी प्रतापगड दर्शन एस.टी.बससेवेचा लाभ भाविकांनी घ्यावा, असे मत माजी नगरसेविका संगिता इंगवले यानी व्यक्त केले. यावेळी निवेदन देताना सामाजिक कार्यकर्ते प्रसाद इंगवले हेदेखील उपस्थित होते.

## एकनाथ मळेकर यांचा मुलगा अनिल मळेकर सेवानिवृत्त

**दै.रायगड नगरी । धाटाव**

भारतीय सैन्य दलात सलग २२ वर्षे देशसेवा करून सेवानिवृत्त झालेल्या अनिल एकनाथ मळेकर यांचा सत्कार सोहळा रोहा तालुक्यातील कुंभोशी येथे आयोजित करण्यात आला होता. यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांनी सलग २२ वर्षे देशसेवा करणाऱ्या अनिल मळेकर यांचे विशेष कौतुक करून त्यांचा सत्कार केला.

याप्रसंगी ओबीसी संघर्ष समितीचे रोहा तालुका अध्यक्ष सुरेशजी मगर, कोळी समाज नेते नवनीतदादा डोलकर, ज्ञानगंगा कोळी समाजाचे खजिनदार रमाकांत पाटील, नवनीत, पाटील, राजेंद्र मळेकर, अनिल मळेकर यांची आई गीता एकनाथ मळेकर, सुरेश चोरगे, श्याम चोरगे, महेश चावरेकर, राजा मळेकर, श्याम पाटील, भावेश वाघमारे, सौरभ डोलकर, बंटी वाघमारे, रोहन शेलार, क्षितीज वाघमारे, सर्वेश डोलकर, तलाठी मळेकर तात्या, वामन डाके, विनायक चोरगे, गणेश मळेकर, ईश्वर मळेकर, होनाजी मळेकर, काशिनाथ मळेकर, सुनील घाग, विलास घाग, महादेव घाग यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



**आज पासून शारदोत्सवाला सुरुवात त्यानिमित्ताने देवीचे दर्शन घेतल्यानंतर मंदिराच्या भोवताली सुंदर निसर्ग पाहायला मिळते. डोंगरावर वसलेले देवीचे मंदिर व त्याभोवती डोंगराची कडा त्यामुळे 'कड्यावरची देवी' अशी या मंदिराची ओळख आहे. शिस्ते,कापोली,व खारशेत भावे या तिन्ही गावाकडून दिवसरात्र श्रद्धा पुर्वक मंदिरामध्ये नवरात्रीचे नऊ दिवस जागरण केल जाते.**


अर्जदारतर्फे वकील : अनंत देवजी पाटील

**जाहीर नोटीस**

अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्यायाधिकरण सो.रायगड यांचे कोर्टात

मो.अप.क्लेम नं.६३/२०१८

नि.नं.१६/ड

रिता पप्पू जयसवाल — अर्जदार

विरुद्ध

१) तुकाराम माणिक वाकडे

२) दि न्यू इंडिया इन्श्युरन्स कं.लि. — सामनेवाला

प्रति,

सामनेवाला नं.१) तुकाराम माणिक वाकडे
रा.एल.आय.जी.२, एफ–९४,
रुम नं.३०, सेक्टर ०२,
सिडको कॉलनी कळंबोली, नवी मुंबई,
ता.पनवेल, जि.रायगड महाराष्ट्र ४१०२१८

दिनांक २८/१२/२०१७ रोजी सायंकाळी ०५.०० वाजण्याच्या सुमारास मौजे : लोधिवली गावचे हद्दीत, धिरुभाई अंबानी हॉस्पिटलसमोर, पुणे–मुंबई एन.एच.४ हायवेवर मुंबई लेनवर, चौक दुरक्षेत्र खालापूर पोलीस स्टेशन, ता.खालापूर, जि.रायगड यांचे हद्दीत झालेल्या अपघातात पप्पू छोटेलाल जयसवाल यांची मुंबई पुणे एन.एच.४ हायवे रोडने जाणारा ट्रेलर क्र.एम.एच.४३/ई ३३५१ या ट्रेलरवरील ड्रायव्हरने ट्रेलर अचानक ब्रेक लावून थांबविल्याने मोटार सायकलची पाठीमागून जोरात ठोकर लागून अपघात घडवून आणला. सदर अपघातामध्ये ट्रेलर क्र.एम.एच.४३/ई ३३५१ वरील चालक हा अर्जदार नं.१ यांचे पती, अर्जदार नं.२ व ३ यांचे वडिल व अर्जदार नं.४ व ५ यांचा मुलगा मयत पप्पू छोटेलाल जयसवाल यांच्या मरणास कारणीभूत ठरला आहे. म्हणून अर्जदार यांनी सामनेवाला विरुद्ध अपघात नुकसान भरपाई मिळणेकरिता अंदाजे रु.५,५०,०००/– ची नुकसान भरपाईचा क्लेम अलिबाग येथील मे.मोटार अपघात न्यायाधिकरण यांचे कोर्टात दाखल केला आहे.

तरी तुम्हास जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, तुम्ही सदर अर्जाचे कामी या न्यायालयात दि.२४/११/२०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता तुम्ही प्रत्यक्ष कायदेशीर वकीलांमार्फत हजर राहून आपले लेखी म्हणणे सादर करावे व आपला पत्ताही न्यायालयात सादर करावा. या मुदतीत आपण न्यायालयात हजर न राहिल्यास सदरहू अर्जाच्या कामी आपल्या विरुद्ध पुढील आदेश करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज तारीख ६/१०/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व कोर्टाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक जिल्हा.न्याया,रायगड–अलिबाग | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक जिल्हा.न्याया,रायगड–अलिबाग


# नांदगावकरांची ग्रामदेवता : भक्तांच्या हाकेला धावणारी नांदगावची भवानी माता

भक्तांच्या हाकेला धावणारी भाविकांचे श्रध्दास्थान असलेल्या मुरुड तालुक्यातील नांदगाव गावाला ओळ–खले जाते ते म्हणजे येथिल प्रसिद्ध श्री सिद्धिविनायक मंदिरामुळेच! सिद्धिविनायक हे जागृत देवस्थान मानले जात असल्याने समस्त भक्तगणांचे ते श्रद्धास्थान आहे.परंतू नांदगावची ग्रामदेवता आहे अर्थातच भवानी देवी !



नांदगावच्या उत्तरेकडे मुरुड– अलिबाग मुख्य रस्त्यावर भवानी मातेचे मंदिर आहे. ह्या देवीचे मुख्य स्थान हे सध्याच्या मंदिरासमोर एक कि.मी.अंतरावरील साकाळे तळे येथे असलेल्या एका अति छोट्या मंदिरात होते.या परिसरात नांदगावमधिल आगरी व अन्य जातीची काही कुटुंब वास्तव्यास होती.त्यांचे हे दैवत म्हणजे श्रद्धास्थान होते.कालांतराने ह्या सर्व कुटुंबांनी साथीच्या रोगामुळे हे स्थान सोडले त्यामुळे मंदिर एकाकी पडले होते.

नांदगाव मधील काही मंडळींनी भवानी मातेला सध्याचे जे मंदिर आहे तेथे एका कौलारु घरात आणून तेथे तिची प्राणप्रतिष्ठा केली.नांदगावचे प्रसिद्ध मूर्तिकार बाळू चोरघे यांनी सध्याची असलेली देवीची व्याघ्रारुढ मूर्ती घडवली आहे.पूर्वी मंदिराच्या परिसरात घनदाट जंगल होते. त्या काळात मंदिरात वाघ येत असल्याचे सांगितले जाते.मंदिर गावच्या जवळपास एक कि.मी.बाहेर असल्यामुळे गावातील मंडळींचे देवीचे मंदिर एक फिरण्याचे ठिकाण बनले होते.हे दैवत येथिल काही कुटुंबाचे कुलदैवत आहे.

भवानी मातेची नित्य पूजा अर्चा मंदिराशेजारी वास्तव्यास असलेल्या बाबू नवाळे हे पूर्वापार करित असून त्यांच्या पश्चात त्यांची मुले त्यांचा वारसा नीत्यनेमाने चालवित आहेत.शेतकरी कामगार पक्षाच्या जयंतभाई पाटील यांनी आपल्या आमदार फंडातून दिलेल्या निधीतून मंदिराचा जिर्णोद्धार करण्यात आला आहे त्यामुळे मंदिराची वास्तू विलोभनीय झाली आहे.मंदिरासमोरील भव्य पटांगणात गावातील नवतरुण मंडळाने शिवाजी महाराजांचा पुतळा उभारला आहे.चैत्र शुद्ध पौर्णिमेला मंदिर परिसरात पूर्वी यात्रा भरत असे. मंदिरानजिकचे जय भवानी भजन मंडळ येथे कार्यक्रम करते.

नवरात्रौत्सवात मंदिरात घट मांडले जातात. गावच्या ब्राम्हण समाजासह अन्य लोक नऊ दिवस आरत्या म्हणतात. तरुण तरुणी दांडीया खेळतात., भजने होतात,सवाष्णी पुजनाने मंदिर गजबजून जाते.अनेक भाविक दर्शनार्थ गर्दी करतात. ही देवी नवसाला पावते म्हणून लोक मंदिरात गर्दी करतात.परंतु यंदा कोरोना रोगाचा प्रादुर्भाव कमी झाला असला तरी सावधगिरी म्हणून शासनाच्या अटि, शर्ती व नियमांचे पालन करत देवीचा उत्सव साजरा करण्यात येत आहे. असे देवळा–तील पुजारी मनोज नवाले यांनी आमच्या प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

**राजीव नेवासेकर**
**पत्रकार, कोर्लई, मुरुड**

# मुरुड तालुका विधी सेवा समितीतर्फे शासकीय विविध योजनांबाबत मार्गदर्शन शिबिर

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण सर्वोच्च न्यायालय दिल्ली तसेच महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण उच्च न्यायालय मुंबई व रायगड जिल्हा विधी सेवा प्राधिकरण यांच्या कडून प्राप्त झालेल्या निर्देशानुसार दि.२ ऑक्टोबर ते दि.१४ ऑक्टोबर २०२१ या कालावधीत भारतभर जागरूकता अभियान व पोहच या कार्यक्रमांतर्गत मुरुड तालुका विधी सेवा समितीतर्फे अध्यक्ष न्यायाधीश संदीप सरोदे यांच्या मार्गदर्शनाखाली तहसील कार्यालयात शासनाच्या विविध योजना व जनतेच्या सार्वजनिक उपयोगाच्या योजनांबाबत मार्गदर्शनपर शिबिराचे आयोजन करण्यात आले.



यावेळी नायब तहसिलदार रवींद्र सानप, महसूल नायब तहसीलदार गोविंद कोटंबे, तालुका कृषी अधिकारी व्ही.डी. आहिरे, सरकारी वकील ॲड.संजय राठोड, ॲड.मोहन तांबडकर, ॲड.डी.एन.पाटील, ॲड.अजित चोगले, ॲड.मृणाल खोत, ड.हुसेन, ॲड.सतविडकर, जयेश गुरव कर्मचारी वृंद उपस्थित होते.

सुरुवातीला सर्व उपस्थितांचे स्वागत करण्यात येऊन कार्यक्रमाला सुरुवात करण्यात आली.भारतभर जागरूकता अभियान व पोहच या कार्यक्रमांतर्गत शासनाच्या विविध योजना व जनतेच्या सार्वजनिक उपयोगाच्या योजनांबाबत ड.अजित चोगले यांनी प्रास्ताविकात आपले विचार मांडले.शेतीविषयक विविध शासकीय योजनांची माहिती तालुका कृषी अधिकारी व्ही.डी.आहिरे यांनी दिली तर जनतेच्या सार्वजनिक उपयोगाच्या योजनांबाबत नायब तहसीलदार रवींद्र सानप यांनी मार्गदर्शन केले.

## तानाजी फार्म हाऊसवर चोरट्याने मारला डल्ला

**दै.रायगड नगरी । गोवे–कोलाड**

रोहा तालुक्यातील आंबेवाडी गावाच्या हद्दीतील मुंबई–गोवा हायवेवरील रेल्वे ब्रिजच्या लगत असणाऱ्या तानाजी शेडगे फार्म हाऊस वरील बंगल्यावर सोमवार दि.४ ऑक्टोबर २०२१ रोजी ७०००० रुपयांचा माल लंपास केला.

या बाबत कोलाड पोलिस सूत्रांन कडून मिळालेल्या माहिती नुसार आंबेवाडी गावाच्या हद्दीतील मुंबई गोवा हायवे कोकण रेल्वे ब्रिजच्या लगत असणाऱ्या तानाजी शेडगे यांच्या फार्म हाऊसवरील बंगल्यावरील स्लायडींग खिडकीचे लॉक तोडून त्यावाटे आत शिरून सॅमसंग कंपनीचे ३५००० रुपये किंमतीचे दोन ४० इंचचे दोन एल.ई.डी टीव्ही असे एकूण ७० हजार किंमतीचा माल चोरट्याने लंपास केला असुन याबाबत कोलाड पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून कोलाड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पो.ह.एम. आर. गायकवाड सह अधिक तपास करीत आहेत.


राव साहेब

अर्जदारातर्फे वकील
ॲड.प्रभु यशवंत भोसले

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.१३२१/२०२१

नि.नं.८/ड

ने.ता.१७/११/२०२१

१) श्रीमती.अरुणा आनंदराव पवार
२) परमेश्वर आनंदराव पवार
३) महेश आनंदराव पवार
१ ते ३ वरील सर्व रा.के.एल–४/३७/३
सेक्टर ४ ई, एम.जी.एम. (जवळ)
हॉस्पिटल, कळंबोली, कळंबोली नोड — अर्जदार

विरुद्ध

१) ज्योती राजेंद्र शिंदे
रा.टाईप–२, बिल्डींग नं.०२, रुम नं.०२,
तळोजा, सेंट्रल जेल, सेक्टर ३५, खारघर, ता.पनवेल
२) स्वाती दिनेश केणी
के.एल.५, बिल्डींग नं.४, रुम नं.०२,
सेक्टर १ ई, कळंबोली नोड, ता.पनवेल, जि.रायगड
३) विद्या जगदीश रामुगडे
रा.रहिमतपुर, ता.कोरेगाव, जि.सातारा — सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, अर्जदार क्र.१ ते ३ व सामनेवाले १ ते ३ हे कै.आनंदराव नामदेव पवार यांचे कायदेशीर वारस आहेत. कै.आनंदराव नामदेव पवार दि.१९/०६/२०२० रोजी एम.जी.एम. हॉस्पिटल कामोठे, ता.पनवेल, जि.रायगड येथे कोरोना संसर्गामुळे मयत झालेले आहेत. त्यांच्या मृत्यूपश्चात त्यांना अर्जदार १ ते ६ हे कायदेशीर वारस आहेत. त्यासंबंधी वारस असल्याचा वारस दाखला मिळण्यासाठी मे.पनवेल कोर्टात अर्ज केलेला आहे. कै.आनंदराव नामदेव पवार दि.१९/०६/२०२० रोजी मयत पावल्याने त्यांच्या पश्चात संपादीत मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे

**मौजे : कळंबोली, ता.पनवेल, जि.रायगड**

| नाव | मिळकतीचे वर्णन | किंमत व क्षेत्रफळ |
|---|---|---|
| श्री.आनंदराव नामदेव पवार | के.एल–०४/३७/३ सेक्टर ४ ई, कळंबोली, कळंबोली नोड, एम.जी.एम. जवळ, ता.पनवेल, जि.रायगड | २,५०,०००/– व २३.०५ स्क्वे. मी. (चौ.मी.) |

सदर वारसाव्यतिरिक्त इतर कोणीही कै.आनंदराव नामदेव पवार यांना वारसदार नाहीत. सबब अर्जदार यांनी सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी मे.दिवाणी कोर्टात दि.चौ.अर्ज क्र.१३२१/२०२१ दाखल केला आहे.

सबब सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणाचीही हरकत असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयाच्या कक्षेत सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणतीही हरकत नाही असे समजून अर्जदारांना वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणर नाही.

आज दि.०७/१०/२०२१ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.क.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.क.स्तर, पनवेल


## कंटेनरच्या धडकेने एक जखमी

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भरधाव कंटेनरच्या धडकेने एक मोटारसायकल स्वार जखमी झाल्याची घटना तालुक्यातील अजिवली येथे घडली आहे.

दिपक काकडे (वय–२५) हे त्यांच्या मोटारसायकल वरून अजिवली येथून जात असताना अज्ञात कंटेनरची धडक त्यांच्या गाडीला बसून त्यात ते जखमी झाले आहेत.

या संदर्भातील तक्रार पनवेल तालुका पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.


श्री.भाकरे सो.कोर्ट

ॲड.भुषण मोरेश्वर म्हात्रे, पनवेल
अर्जदारांचे वकील

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्याायलयात

दि.चौ.अर्ज क्र.१३८६/२०२१

नि.नं.८/ड

ने.ता.१३/१२/२०२१

कै.सदानंद दत्तात्रेय सहस्त्रबुद्धे मयतचे वारस
१) श्रीमती.निर्मला सदानंद सहस्त्रबुद्धे
वय : ८४ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.फ्लॅट नं.४, दिपप्रभा को.ऑप.हौ.सो.लि.,
नरवीर तानाजी चौक, एम.जी.रोड,
कर्वे हॉस्पिटल वरती, नौपाडा, ठाणे प.४००६०२
२) सौ.चारुलता जयंत जोशी
वय : ५९ वर्षे, धंदा : नोकरी
सध्या रा.११०५–१२०, प्रोमिनेड सर्कल,
थ्रॉमहिल ऑन, कॅनडा.
भारतीय पत्ता : फ्लॅट नं.४, दिपप्रभा को.ऑप.हौ.सो.लि.,
नरवीर तानाजी चौक, एम.जी.रोड,
कर्वे हॉस्पिटल वरती, नौपाडा, ठाणे प.४००६०२
३) सौ.चित्रा शिरिष जोशी
वय : ५७ वर्षे, धंदा : नोकरी
रा.ए–१०३–१०४, मृदंग को.ऑप.हौ.सोसायटी,
लोकपुरम ग्लॅडेस अलव्हेरा रोड, पोखरण नं.२ जवळ,
ठाणे प. ४००६१०
४) श्री.जयदीप सदानंद सहस्त्रबुद्धे
वय : ५४ वर्षे, धंदा : सी.ए.
रा. फ्लॅट नं.४, दिपप्रभा को.ऑप.हौ.सो.लि.,
नरवीर तानाजी चौक, एम.जी.रोड,
कर्वे हॉस्पिटल वरती, नौपाडा, ठाणे प.४००६०२ — अर्जदार

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.सदानंद दत्तात्रेय सहस्त्रबुद्धे यांचे दि.२३/०४/२००४ रोजी सहस्त्रबुद्धे हॉस्पिटल, पनवेल येथे निधन झाले असून त्यांची आई कै.इंदिराबाई दत्तात्रेय सहस्त्रबुद्धे यांचे दि.०१/०३/२००६ रोजी सहस्त्रबुद्धे हॉस्पिटल, पनवेल येथे निधन झाले. श्रीमती.निर्मला सदानंद सहस्त्रबुद्धे, वगैरे यांनी कै.सदानंद दत्तात्रेय सहस्त्रबुद्धे यांच्या १/२ हिश्याच्या स्वकष्टार्जित खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

**पारसमणी को.ऑप.हौ.सो.उप भूखंड नं.३, अंतिम भूखंड नं.११९, पायोनियर सोसायटी, हरिओम नगर, पनवेल, फ्लॅट नं.१०१, पहिला मजला, बिल्टअप क्षेत्र ६८० चौ.फूट पैकी सदानंद दत्तात्रेय सहस्त्रबुद्धे यांच्या १/२ हिश्याकरिता (सदर सदनिकेची एकूण किंमत रु.३,०६,००० मात्र)**

वरील मिळकत ही कै.सदानंद दत्तात्रेय सहस्त्रबुद्धे यांच्या स्वकष्टार्जित मालकीची आहे. श्रीमती.निर्मला सदानंद सहस्त्रबुद्धे, वगैरे हे कै.सदानंद दत्तात्रेय सहस्त्रबुद्धे यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्रीमती.निर्मला सदानंद सहस्त्रबुद्धे, वगैरे यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.सदानंद दत्तात्रेय सहस्त्रबुद्धे यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसत्र मंजूर करेल.

आज दि.७/१०/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल


# संदिप कार्लेकर आदर्श पुरस्काराने सन्मानित

**दै.रायगड नगरी । म्हसळा**

रायगड जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार वितरण सोहळा दिनांक १ ऑक्टोबर रोजी कर्जत येथील शेळके सभागृहात मान्यवरांच्या उपस्थितीत नुकताच संपन्न झाला.

सन २०२० चा रायगड जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार म्हसळा तालुक्यातील चाफेवाडी येथील न्यु ईंग्लिश स्कूल, नेवरुळ येथील लिपिक या पदावर कार्यरत असलेले संदीप कार्लेकर यांना प्राप्त झाला. रायगड जिल्हा पालकमंत्री नाम .आदितीताई तटकरे यांच्या हस्ते अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मानचिन्ह देउन गौरविण्यात आले.

संदीप कार्लेकर हे सुतार समाजाचे असल्याने म्हसळा विश्वकर्मा सुतार समाज अध्यक्ष दत्ताजी सुतार व समस्त सुतार बांधव यांनी संदीप कार्लेकर यांना रायगड जिल्हा शिक्षक पुरस्कार प्राप्त झाल्याने शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या त्यावेळी उपस्थित अध्यक्ष. दत्ताजी सुतार, उप अध्यक्ष .नामदेव घुमकर, दत्तात्रय उध्दरकर, नथुराम सुतार, जनार्दन सुतार, संतोष उध्दरकर, सचिन सुतार,आदी मान्यवर उपस्थित होते.


अर्जदाराचे वकील
सौ.संगीता मांजरेकर

**जाहीर नोटीस**

पनवेल येथील मे.सिव्हील जज्ज (सि/डी) यांचे कोर्टात

दि.चौ.अर्ज क्र.७४४/२०२१

नि.नं.८

ने.ता.२०/१०/२०२१

१) मेलिसा रुडॉल्फ फ्रान्सिस — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

ज्याअर्थी कै.मॅटिल्डा रुडॉल्फ फ्रान्सिस ही दि.१५/०१/२०२० रोजी सुरत, गुजरात येथे मृत्यू पावले आहेत. तसेच त्यांचे पती रुडॉल्फ हेन्री फ्रान्सिस हे दि.२५/१०/२००६ रोजी मृत्यू पावले आहेत. त्यांचे नावे खालील वर्णनाची ५०% मिळकत आहे.

**साई आस्था बिल्डींग, फ्लॅट : ४०५, ४ था मजला, प्लॉट : ९०, सेक्टर २३, उलवे, पनवेल–४१०२०६**

कै.मॅटिल्डा रुडॉल्फ फ्रान्सिस यांचे मृत्यू पश्चात त्यांस अर्जदार हे वारस आहेत. सदर वारसा व्यतिरिक्त कोणीही वारसदार नाहीत. सबब, अर्जदार ह्याने सदरचा वारस दाखला मिळण्यासाठी अर्ज करत आहे. सबब, सदरचा वारस दाखला अर्जदार यांस देण्यासंबंधी कोणीही इसमाच्या कोणत्याही हरकती असल्यास त्याने हे नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत ह्या न्यायालयात सादर कराव्यात. मुदतीत हरकती न आल्यास कोणतीही हरकती नाहीत असे समजून अर्जदार यांस वारस दाखला देण्यात येईल व मागाहून येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज तारीख ७/१०/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

सही/– क.लिपीक दि.न्या.व.स्तर, पनवेल | कोर्टाचा शिक्का | सही/– सहा.अधिक्षक दि.न्या.व.स्तर, पनवेल



Hon'ble Bhakare Judge

**ADV. B. U. TAYADE**

**PUBLIC NOTICE**

**IN THE COURT OF HON.CIVIL JUDGE SENIOR DIVISION PANVEL-AT PANVEL**

C.M.A. No.1342/2021

Exh : 8/D

N.D. 13/12/2021

1) Mrs.Anuna Anuruddha Gamare
(Wife of Deceased)
Age : 53, Occupation : Housewife
2) Mr.Sushant Anuruddha Gamare
(Son of Deceased)
Age : 35, Occupation : Service
3) Mr.Akash Anuruddha Gamare
Age : 29, Occupation : Service
(Son of Deceased)
Applicants Nos. 1,2&3 residing at
K-102, Kaveri CHS, Plot No-4,
Sector-5, Kharghar, Raigad
Maharashtra-410210
4) Mrs.Archana Dinesh Kamble
(name after marriage)
Archana Anuruddha Gamare
Age : 33, Occupation : Service
R/o-At/Post-Kundi, Kundi, Kundi,
Ratnagiri, Maharashtra-415804 — Applicants

V/S

NIL — Non Applicant

**The Applicatin for Heirship Certificate of deceased "Anuruddha Dhondiraam Gamare" under Chapter VIII OF Bombay Regulation 1827.**

That, the deceased Anuruddha Dhondiraam Gamare died on 04/04/2007 at Kharghar and he purchased the property, at Kharghar, Navi Mumbai, in Village-Kharghar, Panchayat Samiti, Panvel, Dist-Raigad. I Mrs.Aruna Anuruddha Gamare, Sushant Anuruddha Gamare, Akash Anuruddha Gamare, Mrs.Archana Dinesh Kamble have applied before this Hon'ble Court for Heirship Certificate in favour of them and Mrs.Archana Dinesh Kamble Relinquished her rights and prayed that the Heirship Certificate may be granted in favour of Mrs.Aruna Anuruddha Gamare, Sushant Anuruddha Gamare, Akash Anuruddha Gamare. The description of the Property is as follows.

**Schedule of the properties :-**

a) Flat K-102, First Floor, Kaveri Co-op Housing Society Ltd., Plot No.4, Sector-5, Kharghar, Navi Mumbai, 410210. approx. Area of 365.82 Sq. Ft. i.e. 292.65 Sq. Ft. built up area (Carpet) (27.197 Sq. Mtrs.) for flat in the society's building permitted for residential purpose only. Registered in the office of Joint Sub-Registrar Office S.R.O. Panvel-1, at Serial No.1707/2002 on dated 19/03/2002.

**B) The First Schedule of the property**

All the piece on parcel of land bearing Plot No.4, Sector-5, Node Kharghar, Navi Mumbai, Maharashtra and bounded as under that is to say :

On or Towards East - On or Towards West-
On or Towards South - On or Towards North-

Situated at Village-Kharghar, Tal-Panvel, within the limits of Zillaha Parishad Raigad, Panchayat Samiti Panvel, and Gram Panchayat-Kharghar.

After the death of deceased if there is any encumbrance or interest by way of any persons regarding the above said property should submit their claim before this H'ble Court within 30 days of this notice. If there is no objection raised by any person before this H'ble Court within stipulated period the Heirship Certificate will be declared in favour of the Applicant Nos.1, 2 & 3.

Today it is signed and seal by me on dated 07/10/2021

Sd/- Jr.Clerk C.C.S.C.Panvel | Court Seal | Sd/- Asst.Superintendent C.C.S.C.Panvel

# संक्षिप्त...

## कोलाड पोलिसांची धडक कारवाई, छापा टाकून गावठी दारू जप्त

**दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड**

पोलिस सूत्रांकडून मिळालेल्या माहिती नुसार आंबेवाडी येथील कासा आदिवासी वाडी येथील सोमनाथ सुरेश जाधव वय वर्षे ४० यांच्या घराच्या मागे बांबूच्या बेटा जवळ मोकळ्या जागेवर १० लिटर गावठी दारूचा कॅन छापा टाकून जप्त केला आहे.

याविषयी कोलाड पोस्टे गुरुनं ००८२/२०२१,६५ इतर ६प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला असून कोलाड सपोनि सुभाष जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली पो.ह.वा. एन. एस. पाटील,पो.ना.ऐ.बी पाटील, समिर कोकाटे अधिक तपास करीत आहेत.

## पुगाव केंद्रातर्फे आदर्श शिक्षक ब्रिजेश भादेकर यांचा विशेष सन्मान

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

रा. जि.परिषद प्राथ.शाळा धानकान्हे या शाळेचे माजी मुख्याध्यापक तथा दुर्गम क्षेत्रातील खातेलीवाडी शाळेचे विद्यमान मुख्याध्यापक ब्रिजेश बाळकृष्ण भादेकर यांना सन २०२०/२१ यावर्षाचा रायगड जिल्हा परिषदेचा जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाल्याबद्दल पुगाव केंद्राच्या वतीने विशेष सत्कार समारंभ आयोजित करून त्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

यावेळी केंद्रप्रमुख संघटनेचे राज्य उपाध्यक्ष तथा कोलाड बीटाचे विस्तार अधिकारी तथा पुगाव केंद्राचे केंद्रप्रमुख रत्नाकर कनोजे,धाटाव केंद्राचे केंद्रप्रमुख तथा महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती अध्यक्ष नारायण गायकर,आरे बुद्रुक केंद्राच्या केंद्रप्रमुखा तथा म. रा. प्राथ. शिक्षक समिती रोहा कोषाध्यक्षा श्रीमती विद्या रोहेकर, पुगाव केंद्रीय शाळेचे मुख्याध्यापक निवास थळे, सामाजिक कार्यकर्ते पांडुरंग गोसावी धानकान्हे शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षा रमिता माहित, माजी अध्यक्षा वैशाली गोसावी, सदस्या कचरे, श्रीमती सुजाता बाईत, अंगणवाडी बाई श्रीमती सुशिला कचरे, देवकान्हे ग्रामपंचायत कर्मचारी विनायक गोसावी, विद्यार्थी व पालकवर्ग बहुसंख्येने उपस्थित होते. यावेळी अधिकारीवर्ग, शिक्षक वर्ग व पदाधिकारी यांनी सत्कारमूर्ती आदर्श शिक्षक बिजेश भादेकर यांच्या कार्याविषयी उल्लेखनीय मनोगत व्यक्त करून पुढील यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

**वाचकांना विनम्र सूचना**

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**

# ना.आदिती तटकरे यांनी तीर्थक्षेत्र पालीतील बल्लाळेश्वराचे घेतले दर्शन

**दै.रायगड नगरी । धम्मशील सावंत**



**पाली/बेणसे** : कोव्हिडं १९ विषाणू संसर्गाने संपूर्ण जगाला वेठीस धरले. पहिल्या व दुसऱ्या लाटेत राज्य व देशात हजारो निष्पाप जीवांचा बळी गेला. त्यामुळे खबरदारी चा उपाय म्हणून सर्व धार्मिक स्थळे, मंदिरे बंद ठेवण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला होता, मात्र सद्यस्थितीत तिसऱ्या लाटेदरम्यान कोरोना रुग्णसंख्या घटत असल्याने राज्य सरकारने नवरात्री उत्सवाच्या पार्श्वभूमीवर गुरुवार (दि.७) पासून सर्व धार्मिक स्थळे खुली करण्याचा घेतलेल्या निर्णयाचे सर्व स्थरातून स्वागत होत आहे. मात्र कोरोनाचे संकट अजूनही टळलेले नाही त्यामुळे भाविकांनी दर्शन घेत असतांना सर्व नियम व निकषांचे पालन करावे असे आवाहन रायगड जिल्ह्याच्या पालकमंत्री अदिती तटकरे यांनी केले. अदिती तटकरे यांनी गुरुवारी (ता.७) अष्टविनायक तीर्थक्षेत्र पालीतील बल्लाळेश्वराचे दर्शन घेतले.

पालकमंत्री ना. तटकरे पुढे म्हणाल्या की सर्वत्र धार्मिक व मंगलमय वातावरण आहे, नवरात्री उत्सवानिमित्त दि. ११ ऑक्टोबर रोजी संपूर्ण जिल्ह्यात महिलांसाठी जवळच्या आरोग्य केंद्रात कोव्हिडं लसीकरण मोहीम राबविली जाणार आहे, तरी अधिकाधिक महिलांनी लस घ्यावी असे आवाहन पालकमंत्री तटकरे यांनी केले.

खूप दिवसांपासून मंदिरात जाऊन दर्शन घेण्यासाठी भाविक आतुर होते. मंदिरे खुली करण्यात यावित अशी मागणी भाविक करीत होते, अखेर सर्वांची प्रतीक्षा संपली व प्रार्थना स्थळे दर्शनासाठी खुली झाली. भाविक आज खूप आनंदी आहेत. कोरोना संदर्भातील अटी व नियम प्रत्येक धार्मिक संस्था व विश्वस्त पाळ-तीलच मात्र एक भाविक म्हणून प्रत्येकाने आपली जबाबदारी समजून दर्शन घेतांना नियम व अटी पाळाव्यात असे आवाहन देखील अदिती तटकरे यांनी केले. तसेच बल्लाळेश्वर तीर्थक्षेत्र विकासा संदर्भात आढावा देखील घेतला. मागील वर्षीपेक्षा गणेशोत्सव व नवरात्रो उत्सवात अटी शिथिल केल्या आहेत. सवलती दिल्या आहेत,पुढील वर्षी कोव्हिडं ची स्थिती नसली तर गरबा व सारेच उत्सव आपणास साजरे करण्यास मुभा मिळू शकेल, अशी आशा व्यक्त केली. यावेळी बल्लाळेश्वर देवस्थान तर्फे अदिती तटकरे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी बल्लाळेश्वर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष धनंजय धारप म्हणाले की मंदिरे सुरू झाली याचे प्रत्येकाला आत्मिक समाधान आहे, मंदिरे कायम सुरू राहण्यासाठी शासन नियम देखील सर्वांनी पाळले पाहिजेत. मंदिर परिसरात प्रवेशद्वारावर प्रवेश करताच हॅण्ड सॅनिटयार वथर्मल स्कॅनिंग होत आहे. प्रत्येक भाविकाला मास्क अनिवार्य असणार आहे. सभामंडपात प्रत्येक भाविकांमध्ये अंतरासाठी सहा फुटांवर गोल सर्कल करण्यात आले आहेत.

यामध्ये बसूनच भाविक दर्शन घेत आहेत. कुठेही गर्दी किंवा अनुचित प्रकार घडू नये, यासाठी देवस्थान ट्रस्टचे सुरक्षारक्षक बंदोबस्ताकरिता तैनात आहेत. मंदिरात आतमध्ये प्रवेश व बाहेर पडण्यासाठी स्वतंत्र प्रवेशद्वाराची सोय केली आहे. मुख्य गाभाऱ्यात भाविकांना प्रवेश नाही. सभामंडपातूनच भाविकांना दर्शनासाठी व्यवस्था केली आहे. मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांनी शासन नियमांचे पालन करून ट्रस्टला सहकार्य करावे असे आवाहन अध्यक्ष ॲड धनंजय धारप यांनी केले आहे.

# खारघर मधील रस्ते, पदपथांवर फेरीवाल्यांचे अतिक्रमण; महापालिकेचे दुर्लक्ष

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खारघर सेक्टर-२०,११ आणि १२ तसेच सेक्टर-७ बँक ऑफ इंडिया कडून नवरंग मार्गे गोखले शाळेकडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला पदपथावर व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांना 'सिडको'ने सेक्टर-१२ मधील तीन ठिकाणी भूखंड उपलब्ध करुन देत पदपथ मोकळे केले होते. मात्र, पुन्हा फेरीवाल्यांनी पदपथावर अतिक्रमण करुन व्यवसाय करीत असताना पनवेल महापालिकेकडून कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नसल्याचे दिसून येते.

खारघर परिसरातील रस्ते आणि पदपथांवर फेरीवाल्यांनी अतिक्रमण करुन व्यवसाय थाटल्याने वाटसरुंना नाहक त्रास होत असे. त्यामुळे 'सिडको'ने सेक्टर निहाय भाजी मार्केटसाठी भूखंड राखून ठेवले आहे. त्यामुळे 'सिडको'ने फेरीवाल्यांना भूखंड उपलब्ध करुन द्यावे यासाठी भाजपाने महापालिका निवडणुकीपूर्वी आंदोलन केल्यावर 'सिडको'ने खारघर मधील राखीव भूखंड फेरीवाल्यांना उपलब्ध करुन दिले. त्यामुळे खारघर मधील रस्ते, पदपथ मोकळे झाले होते. भाजपच्या प्रयत्नामुळे खारघर मधील रस्ते आणि पदपथ मोकळे झाल्याने नागरिक समाधान व्यक्त केले होते. मात्र, हळूहळू पुन्हा फेरीवाल्यांनी खारघर मधील बँक ऑफ इंडिया कडून गोखले शाळेकडे जाणाऱ्या आणि सकाळ सोसायटी कडून सेक्टर-११ कडे जाणाऱ्या रस्त्याच्या कडेला आणि पदपथांवर अतिक्रमण करुन व्यवसाय थाटले आहे. त्यामुळे पुन्हा परिस्थिती जैसे थे झाली असून महापालिकेने फेरीवाल्यांवर कारवाई करुन रस्ते आणि पदपथ मोकळे करावे, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. या विषयी सिडको अधिकाऱ्यांकडे विच-ारणा केली असता, पदपथावर अतिक्रमण करुन व्यवसाय करणाऱ्यांवर महापालिकेने कारवाई करावी, असे त्यांच्याकडून सांगण्यात आले.

### फेरीवाल्यांमुळे वाहतूक कोंडी

खारघर, सेक्टर-१२ मधील नवरंग सर्कल मध्ये रस्त्याचा कडेला सायंकाळी चार ते रात्री नऊ या वेळेत रस्ते, पदपथावर अतिक्रमण करुन अनधिकृतपणे व्यवसाय करतात. मात्र, महापालिकेकडून कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नाही. या विषयी जवळच व्यवसाय करणाऱ्या दुकानदाराकडे विचारणा केली असता, दुकानदारांनी नियमाचे उल्लंघन केल्यास महापालिकेकडून दंडात्मक कारवाई केली. मात्र, अनधिकृत फेरीवाल्यांवर कोणत्याही प्रकारची कारवाई केली जात नाही. असा संशोधनाचा विषय असल्याचे समजले.

# पनवेल तहसीलदार कार्यालयात 'सिनियर सिटीझन ऍक्ट' या विषयावर जेष्ठ नागरिकांना मार्गदर्शन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, उच्च न्यायलय, मुंबई यांनी दिलेल्या सुचनांप्रमाणे जिल्हा विधी सेवा प्राधिकरण रायगड-अलिबाग यांच्या मार्गदर्शनाखाली दि.०२ ऑक्टोबर ते दि.१४ ऑक्टोबर या काळात पॅन इंडिया अवेरनेस चे आयोजन करण्यात येत आहे. या अनुषंगाने पनवेल तहसीलदार कार्यालयात जेष्ठ नागरिकांसाठी कायदेविषयक शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

तालुका विधी सेवा समिती पनवेल अध्यक्ष तथा जिल्हा न्यायाधीश व अतिरिक्त सत्र न्यायाधीश पनवेल जिल्हा न्यायालय आर. जी. अस्मर यांच्या माध्यमातून गुरुवारी सकाळी ११ वाजता पनवेल तहसिल कार्यालयात 'स्कीम ऑफ लीगल एड सर्व्हिसेस' बाबत 'सिनियर सिटीझन ऍक्ट' या विषयावर जेष्ठ नागरीकांना मार्गदर्शन करण्यासाठी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करण्यासाठी प्रमुख वक्ते म्हणून पनवेल बार असोसिएशनचे विधिज्ञ अनिल जाधव हे उपस्थित होते. तर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर व प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ नागरीक संघटना पनवेल शहरचे अध्यक्ष नंदकुमार जयराम जोशी हे उपस्थित होते.

यावेळी कार्यक्रमाच्या सुरुवातीला तहसीलदार विजय तळेकर यांनी जेष्ठ नागरीकांसाठी केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांची माहिती उपस्थित जेष्ठ नागरीकांना उपलब्ध करुन दिली. त्यानंतर विधिज्ञ अनिल जाधव यांनी सिनियर सिटीझन ऍक्ट २००७ मधील जेष्ठ नागरीकांचे हक्क आणि अधिकार व कायद्यातील विविध तरतूदी व कार्यपध्दती अगदी सोप्या भाषेत जेष्ठ नागरीकांना समजाऊन सांगितल्या. कार्यक्रमाच्या शेवटी जेष्ठ नागरीकांनी विचारलेल्या विविध प्रश्नांना वक्त्यांनी कायदेशीर माहितीसह उत्तरे दिली. या शिबिरास प्रचंड प्रतिसाद लाभला असून मोठया संख्येने पुरूष व महिला जेष्ठ नागरीक यांनी उपस्थित राहून जेष्ठ नागरीकांचे हक्क व अधिकार याविषयी माहिती प्राप्त करुन घेतली.



# तालुक्यातील धार्मिक स्थळेही गजबजु लागली

**दै.रायगड नगरी । उरण**

राज्य शासनाच्या निर्देशानु-सार नवरात्रोत्सवाच्या पहिल्या दिवसापासून तालुक्यातील धार्मिक स्थळे तसेच देवस्थाने खुली करण्यात येत आहेत. नवरात्रोत्सव आणि अनेक महिन्यांनंतर खुली होत असलेली मंदिरे यांमुळे या ठिकाणी भाविकांची गर्दी होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. मात्र, भाविकांच्या गर्दीचे नियोजन करण्यासाठी मंदिर व्यवस्थापनांनी खबरदारी घेण्यास सुरुवात केली आहे. काही ठिकाणी गाभाऱ्यात प्रवेश बंद करण्यात आला असून अनेक ठिकाणी एका वेळी ठराविक भाविकांनाच आत सोडण्यात येणार आहे.




करोनाची दुसरी लाट ओसरल्यामुळे राज्य शासनाने टाळेबंदीत शिथिलता आणली. त्यानंतर धार्मिक स्थळे सुरू करण्याची मागणीही जोर धरू लागली होती. त्यानुसार राज्य शासनाने नवरात्रोत्सवाच्या पहिल्या दिवशी म्हणजेच ७ ऑक्टोबरपासून धार्मिक स्थळे सुरू करण्यास परवानगी दिली. या पार्श्वभूमीवर गेल्या दोन दिवसांपासून तालुक्यातील धार्मिक स्थळांमध्ये साफसफाई तसेच निर्जंतुकीकरण करण्यासाठी लगबग सुरू होती. करोनाचा संसर्ग पुन्हा वाढू नये तसेच मंदिर बंद करण्याची वेळ पुन्हा येऊ नये यासाठी एका वेळेस ठराविक भाविकांना मंदिरात प्रवेश देण्याचे ठरविले आहे. तालुक्यातील मंदिरे सर्व नियमांचे पालन करून सुरू करण्यात आली आहेत. यामुळे भाविकांमध्ये समाधान व्यक्त केले जात आहे.

# ट्रेलरच्या धडकेने वृद्ध इसमाचा मृत्यू

**दै.रायगड नगरी । पनवेल**

भरधाव ट्रेलरच्या धडकेने होंडा ऍक्टिवा स्कुटीवरील चालकाचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना तालुक्यातील कोन पोलीस चौकी समोरील रस्त्यावर घडली आहे.

बाळाराम बाबरे (वय ७१ )हे त्यांच्या ताब्यातील होंडा ऍक्टिवा स्कुटी दुचाकी वाहन घेऊन कोन पोलीस चौकी जवळील रस्त्यावरून जात असताना भरधाव ट्रेलरने दिलेल्या धडकेमुळे ते गंभीर जखमी झाल्याने त्यांचा मृत्यू झाला.

# गाडीच्या डिकीतून मोबाईल लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

ऍक्टिवा स्कुटीमधील डिकीमध्ये ठेवलेला एक मोबाईल फोन अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची घटना तालुक्यातील मोरबे येथील धरणाच्या काठी घडली आहे.

रोहन हातमोडे हा तरुण त्याच्याकडील ऍक्टिवा स्कुटीमध्ये १५ हजार रुपये किंमतीचा विवो कंपनीचा मोबाईल डिकीमध्ये ठेवून धरणाच्या काठी फिरण्यास गेला असता अज्ञात चोरट्याने डिकीचे लॉक तोडून लबाडीने मोबाईल चोरून नेल्याने या बाबतची तक्रार पनवेल पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

# एम.आय.डी.सी.ला शेतकऱ्यांचा तीव्र विरोध ; प्रकल्पच नको शेतकऱ्यांचा ठराव



**दै.रायगड नगरी । पेण**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळा मार्फत पेण तालुक्यातील डोलवी औद्योगिक विकास क्षेत्रासाठी काराव -गडब, डोलवी, वडखळ बोरी ग्रामपंचायत परिसरातील बेणेघाट, कोलवे, वावे, डोलवी, खारकारावी, काराव, खारमांचेळा, खारघाट, खारचिर्बी, खारजांभेळा, खारढोंबी या गावातील २१०० एकर जमिन संपादित करण्यात येणार आहे. या भुसंपादनाला येथील शेतकऱ्यांनी विरोध दर्शविला असुन भुसंपादन रद्द करावे या मागणीसाठी जिल्ह्या-तील लोकप्रतिनिधी, शासकीय अधिकारी यांची भेट घेतली व येथील शेतकऱ्यांचा या भुसंपादनाला विरोध असुन यााबाबतीत चर्चा केली व ही बाब शासन दरबारी मांडावी व हे भुसंपादन रद्द करावे या मागणीचे निवेदन त्यांना दिले होते. या संदर्भात शिवसेनेचे माजी रायगड जिल्हा प्रमुख विष्णु पाटील यांचे समवेत शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने राज्याचे उद्योगमंत्री सुभाष देसाई यांची भेट घेतली. या बैठकीत या भुसंपादनाला शेतकऱ्यांचा विरोध असल्याचे शिष्टमंडळाने सांगितले, परंतु हे भुसंपादन जेएसडब्लु कंपनीच्या विस्तारासाठी होत असुन हे भुसंपादन शेतकऱ्यांना विश्वासात घेवुनच होईल, हे भुसंपादन होत असताना शेतकऱ्यांना जागेचा मोबदला, नोकरी, भुखंड देणार व तसा कायदा करुन घेणार असे उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी शिष्टमंडळाला ग्वाही दिली होती.

त्या अनुषगांने शिवसेनेचे माजी रायगड जिल्हा प्रमुख विष्णु पाटील यांच्या अध्यक्षतेखाली गडब येथील कांळबादेवी मंदिराचे प्रांगणात प्रकल्पबाधित शेतकऱ्यांची बैठक घेण्यात आली. यावेळी काराव-गडब ग्रामपंचायतीचे उपसरपंच लक्ष्मण कोठेकर, माजी सरपंच विजय पाटील, माजी उपसरपंच तुळशिदास कोठेकर, वडखळ ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच रंविद्र म्हात्रे, परशुराम म्हात्रे, आदिसह बेणेघाट, कोलवे, वावे, डोलवी, खारकारावी, काराव, खारमांचेळा, खारघाट, खारचिर्बी, खारजांभेळा, खारढोंबी या गावातील शेतकरी व महिला बहुसंख्येने उपस्थित होते.

> या वेळी उपस्थित शेतकऱ्यांनी या भुसंपादनाला विरोध असल्याचे सांगुन तसा ठरावच या सभेत मंजुर केला. तर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत होणाऱ्या भुसंपादनात नोकरी व भुखंड मिळत नसल्याने आम्हाला हा प्रकल्पच नको व या प्रकल्पामुळे आम्ही भुमीहीन होणार असुन, ग्रामविस्ताराला जागाच राहणार नसल्याने प्रकल्पाला आमचा तीव्र विरोध असल्याचे शेतकऱ्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने उद्योगमंत्री सुभाष देसाई यांची भेट घेतली असता महाराष्ट्र ओद्योगिक विकास महामंडळामार्फत होणारे हे भुसंपादन शेतकऱ्यांना विश्वासात घेवुनच होणार आहे, जागेचा योग्य मोबदला या प्रकल्पात शेतकऱ्यांना नोकरी, विकसित भुखंड, देण्याबाबत तसा कायदा करण्यात येईल असे उद्योगमंत्री सुभाष देसाई यांनी शिष्टमंडळाला सांगितले असुन या विषयावर चर्चा करण्यासाठी ही शेतकऱ्यांची बैठक असल्याचे उपस्थित शेतकऱ्यांना विष्णु पाटील यांनी सांगितले.

शेतकऱ्यांनी संघटीत होणे गरजेचे आहे शेतकऱ्यांनी संघटीत व्हावे मी येथील शेतकरी असुन शेतकरी जो निर्णय घेतील त्या निर्णयाशी मी सहमत असुन मी शेतकऱ्यांच्या बरोबर असल्याचे शिवसेनेचे माजी रायगड जिल्हा प्रमुख विष्णु पाटील यांनी यावेळी सांगितले. उद्योग मत्र्यांकडुन आलेला प्रस्ताव चांगला आहे हा प्रस्ताव मंजुर करावा परंतु येथील ग्रामविस्ताराला जागाच राहाणार नसल्याने शेतकऱ्यांना या ठिकाणी हा प्रकल्पच नको असल्याने येथील भुसंपादन रद्द करावे असे रायगड जिल्हा काँग्रेसचे चिटणीस परशुराम म्हात्रे यांनी यावेळी सांगितले.

# लस आपल्या दारी, पनवेल महापालिकेचा आरोग्यदायी उपक्रम

**दै.रायगड नगरी । दिपक घोसाळकर**



**कळंबोली** : पनवेल महापालिका क्षेत्रातील नागरिकाचे कोरोना लसीकरण व्हावे यासाठी पनवेल महापालिकेने आरोग्य विभागामार्फत नागरिकांचे लसीकरण आता गृह निर्माण संस्थांमधून जाऊन करण्याचे सुरू केले आहे. आज पनवेल चे कार्यसम्राट आमदार प्रशांत दादा ठाकुर यांच्या हस्ते कळंबोलीतील गुरुविल्ला हौसिंग सोसायटी मध्ये लस आपल्या दारी या आरोग्यदायी योजनेचा शुभारंभ करण्यात आला. सदरची नागरिकांच्या हिताची व आरोग्याची काळजी घेणारी ही योजना महापालिकेतील नगरसेवक बबन मुकादम यांच्या प्रयत्नाने साकारली गेली आहे. या योजनेचा फायदा कळंबोलीतील नागरिकांनी चांगला घेऊन उत्तम प्रतिसाद दिला.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निर्देशान-ुसार नागरिकांचे लसीकरण पूर्ण व्हावे या आरोग्य व सामाजिक हेतूने पनवेल महापालिकेच्या आरोग्य विभागामार्फत आज कळंबोली मध्ये लस आपल्या दारी या उपक्रमाचे शुभारंभ आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. कळंबोलीतील गुरुव्हीला गृहनिर्माण सोसायटीच्या मध्ये प्रारंभ करताना महापालिकेतील नगरसेवक बबन मुकादम, भाजपाचे कळंबोली शहराध्यक्ष रवीशेठ पाटील, माजी जिल्हा परिषद सदस्य प्रिया मुकादम, कळंबोली भाजपाचे चिटणीस संतोष गायकवाड, प्रकाश शेलार, राजन पिल्ले, सोसायटीचे अध्यक्ष जगदीश पाटील, खजिनदार अशोक भोसले, गहीनाथ धुमाळ, दीपक दळवी, महापालिकेचे डॉक्टर अनिल पाटील, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते अप्पा कुंभार, तसेच मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

यावेळी मार्गदर्शन करताना आमदार प्रशांत ठाकूर म्हणाले की देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी आपल्या देशातील प्रत्येकाची काळजी घेत असून देश कोरणा मुक्त व्हावा यासाठी ते अहोरात्र मेहनत घेत आहेत. केंद्राच्या योजनेतून विविध कल्याणकारी योजना या समाजासाठी त्यांच्याकडून मिळत आहेत. पनवेल महापालिकेच्या माध्यमातूनही नागरी सुविधा व समाजकार्य योजना या कार्यान्वित केल्या जात असून देशाची सुरक्षा व देशाचा विकास हा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या माध्यमातून साकारला जात आहे. लस आपल्या दारी या योजनेच्या माध्यमातून कळंबोलीतील जवळपास ७५ नागरीकांनी या योजनेचा फायदा घेऊन लसीकरण केले. यासाठी आरोग्य विभागाच्या कर्मचाऱ्यांनीही मोलाचे योगदान दिले.